
# वैदिक दिनदर्शिका

## सायन पंचांगाधारित चांद्रमास शकसंवत्सर १९४७

## खगोलीय कालचक्र




आपण आपले सणवार , व्रत-वैकल्ये, उत्सव, इत्यादी धार्मिक कार्ये चुकीच्या दिवशी साजरी करत आहोत.
निरयन पंचांगाचा दुराग्रही वापर केल्याने हे घडते आहे. ते कसे ते समजून घेऊ या .

### निरयन पंचांग अशुद्ध का समजावे ? मुख्यत:तीन गोष्टी :

**(१)** निरयन पंचांगे दृक् प्रत्ययी नाहीत. म्हणजेच पंचांगातील स्थिती आकाशातील स्थितीशी जुळत नाही. काही पंचांगे दृक् प्रत्ययी असल्याचा दावा करतात. हा दावा चूक आहे. **(२)** निरयन पंचांगे २७ नक्षत्रावर आधारित आहेत आणि ती सर्व नक्षत्रांचा अंश काल समान मानून चालतात. प्रत्यक्षात नक्षत्रे २८ आहेत आणि त्यांचा अंश काल असमान आहे. अभिजीत हे २२ वे नक्षत्र ज्याचा अंशकाल विस्तृत आहे ते या पंचांगात विचारातच घेतलेले नाही. **(३)** सर्वात महत्वाचे म्हणजे ही पंचांगे चुकीच्या भोगांशावर आधारित आहेत. **वेधशाळेकडून मिळणाऱ्या अचूक माहितीला अनावश्यक गणितीय सूत्र लावून ती चुकीची बनवली जाते** आणि मग त्या चुकीच्या माहितीवर पंचांग बनवले जाते.

**थोडक्यात माहिती :** **(क)** ज्योतिषाच्या भाषेत यन्त्रकलेला वेधसिद्ध किंवा प्रयोगात्मक पद्धतीने घेणे - विचार करणे असेही म्हटले जाते. सूर्यसिध्दान्तानेच त्रिप्रश्नाधिकारातच असे म्हटले आहे की गणिती प्रक्रियेने जर एखादी भचक्रीय गोष्ट स्पष्ट होत नसेल तर यन्त्रकलेचा (observational way) जो सिद्धान्त असेल त्यानुसार विधीपूर्वक पाहून त्याचा स्वीकार करावा. एक थोर **खगोलशास्त्रज्ञ श्री. व्यंकटेश केतकर** यांनी "ज्योतिर्गणितम्" मधे तसेच सूर्यसिध्दान्त - स्पष्टाधिकार १४ वा श्लोक म्हणतो की **खगोल शास्त्रीय सत्य जे दिसते आहे त्यात व गणितीय निष्कर्षात फरक असेल तर प्रत्यक्ष स्थितीशी मेळ घालूनच तथ्य स्वीकारावे - सांगावे - घ्यावे.** याच विषयातील अशुद्धता (कमतरता) प्रचलित पञ्चाङ्गांच्या तोकडेपणाला सर्वाधिक जबाबदार आहे.

**(ख)** शक ८५४ (९३२ ई०) मधे **आचार्य मुञ्जाल** यांनी एक मोठे क्रान्तिकारी कार्य केले होते. त्यांनी विषुववृत्तापासूनच्या सूर्याच्या भोगांशाच्या गणितीय अंतरासाठी एक शोध प्रस्तुत केला. हे संशोधन तात्कालिक अयनांशाशी जुळत होते. **अयनांशाच्या गणितीय उपयोगाचा हा पहिला प्रयोग प्रारम्भ झाला ज्यात गणितीय भोगांशाना दृक् प्रत्ययी अथवा सायन बनवण्यासाठी अयनांशाचा उपयोग केला गेला.** त्यानंतर जेव्हा वेधशाळांकडून ग्रहांचे प्रत्यक्ष भोगांश दृक् प्रत्ययी (जसे दिसत आहेत तसे) मिळू लागले तेव्हा पासून त्या संशोधनाचा वापर करणे - ते लागू करणे - याची गरजच उरली नव्हती. परंतु ....... गणितीय शास्त्राबाबत अनभिज्ञ ज्योतिर्विद, वेधशाळेतून मिळालेल्या स्थितीला ते संशोधन जोडून सुयोग्य असलेली स्थिती प्रयत्नपूर्वक चुकीची घेत राहिले आणि तीच चूक (म्हणजे अवैज्ञानिक निरयन प्रणाली) आज पंचांगकर्त्यांची परंपरा बनली आहे !आज नासा/ स्विस ऐफेमैरिज/ किंवा भारतवर्षातही शासकीय जीवाजी वेधशाला, उज्जैन आदि वेधशाळांकडून मिळणाऱ्या स्थिती शुद्ध रुपातच मिळतात. मग त्यात कथित अयनांश संशोधनाच्या नावावर सुधारणा करण्याची आवश्यकताच नाहीये. पूर्वी चुकीची दुरुस्ती करण्यासाठी सुधारणा केली जात असे. आणि तेच आचार्यांचे उद्दिष्ट होते. **परंतु आज बरोबर (योग्य) असलेल्या माहितीला चुकीचे करण्यासाठी अयनांशाचा उपयोग केला जातो आहे. आणि पंचांगे चुकीची बनताहेत.**

**आचार्य दार्शनेय लोकेश यांच्या लेखांवरून संकलित. संकलक : सीएमए रमेश मोरेश्वर जोशी भ्र० ९८६९४१३७५२ vaidikdinadarshika@gmail.com**

दिनदर्शिकेच्या या उपक्रमाबाबत आपला अभिप्राय, मत, सूचना, शंका, प्रश्न नक्की पाठवावे.

# वैदिक दिनदर्शिका

सायन पंचांगाधारित चांद्रमास शकसंवत्सर १९४७

## भारतीय कालमापन


भारतीय कालमापन अधिक शास्त्रशुद्ध आहे. ती सभोवतालच्या निसर्गावर अवलंबून आहे. जेणेकरुन ती सर्वसामान्य लोकांना कळते.भारतीय कालमापन हे संपूर्णपणे निर्दोष आणि अधिक शास्त्रशुद्ध आहे कारण पृथ्वी आणि आसपासचे ग्रह, तारकासमुह ह्यांच्या गतीचे त्यात योग्य ते प्रतिबिंब असते.

(१) चैत्र प्रतिपदा ते फाल्गुन अमावस्या हे आपलं सामान्य वर्ष झाले.

(२) अश्विन महीन्यात येणाऱ्या नवमी पासून वैदीक कालगणनेनुसार आपलं शैक्षणिक वर्ष सुरू होतं (ह्या वेळी बहुतेक करुन भारतात सगळी कडे पाऊस संपलेला असतो, पूरपाणी ओसरलेले असते, थोडीफार स्थिर सावरता आलेली असते)


(३) बलिप्रतिपदा म्हणजे कार्तिक शुद्ध प्रतिपदा ते अश्विन अमावस्या असं आपलं व्यापारी वर्ष असते (हे ही निसर्गावर अवलंबून आहे, जिरायत हंगाम संपत आलेला असतो, पीक पाण्याचा अंदाज आलेला असतो. शासनाला त्यांची धेय धोरण आखायला बरं पडतं, बहुतेक सणवार, व्रत वैकल्ये संपलेली असल्याने लोकांना इतर गोष्टी करता वेळ मिळू शकतो, शेतकरी पुढच्या हंगामात करता तयारी सुरू करतो)

## पंचांगीय संज्ञा




# निरामय जीवनासाठी

## नक्षत्र - नक्षत्रा नुसार शेती एक शाश्वत कृषी पद्धती




## विषमुक्त अन्न उत्पादनासाठी चंद्राच्या ६ गतिचक्रांचा शेतीत उपयोग

| | |
|---|---|
| १) शुक्ल पक्ष : कृष्ण पक्ष | – जमिनीतील आर्द्रता वाढत जाणे ते कमी होत जाणे. |
| **२) चंद्र-शनि प्रति युती** | – ही पेरणी साठी उत्तम. या काळात कॅल्शीयम व सिलिका झाड उत्तमरित्या घेते. |
| **३) चढता व उतरता चंद्र** | – जमीन श्वास बाहेर सोडते व आत घेते. |
| **४) चंद्र व पृथ्वी परिक्रमा छेदन बिंदू** | – हा कृषी कार्यास अयोग्य दिवस. |
| **५) चंद्र व पृथ्वी जवळ व दूर असणे** | – चंद्र जवळ असताना ओलावा वाढतो, द्रव झाडात वर चढते. चंद्र दूर असताना कोरडेपणा वाढतो, द्रवाची ऊर्ध्वगती कमी होते. |
| **६) चंद्र नक्षत्र** | – दिवसाच्या नक्षत्राचे तत्व जास्त प्रभावी असते. |

### नक्षत्र शेती ही सूर्य नक्षत्रांच्या आधारे केली जाते.

सर्व सजीव सृष्टीवर आकाश, वायु, अग्नी, जल व पृथ्वी या पंच महाभूतांचा प्रभाव असतो, अशी स-प्रमाण मान्यता आहे. वनस्पती सजीव आहेत. त्यांचे वर सुद्धा या पंचतत्वांचा प्रभाव पडत असतो. तसेच वनस्पती मोठ्या प्रमाणावर सौर शक्तीचा वापर करतात. अशी सौर शक्ती वर्षाच्या प्रत्येक दिवशी कमी अधिक प्रमाणात पृथ्वीवर उपलब्ध असते. कारण पृथ्वी सूर्याभोवती लंबवर्तुळाकार फिरते. या एक वर्षाच्या परिक्रमेमधे पृथ्वीचे स्थान नक्की करण्यासाठी पूर्वजांनी २८ नक्षत्रांची स्थाननिश्चीती केली. उदा. जेव्हा सूर्य अश्विनी नक्षत्रात आहे असे आपण म्हणतो तेव्हा पृथ्वीच्या परिक्रमेतील किती अंशावर पृथ्वी स्थित आहे हे लक्षात येते. पंच महाभूतांचा सृष्टीच्या जडण घडणीत महत्वाचा वाटा आहे. त्यानुसार प्रत्येक नक्षत्राचे प्रभावी तत्व ( पंच महाभूत ) कोणते हे पूर्वजांनी नक्की केले आहे. तसेच वनस्पती कोणत्या तत्वाच्या आहेत हे ही नक्की केले आहे. त्या नुसार वनस्पतीची लागवड त्याच तत्वाच्या नक्षत्रात केल्यास वनस्पतीच्या निरोगी वाढीस चालना मिळते हे अनुभव सिद्ध आहे. त्याचा तक्ता पुढील प्रमाणे :

| तत्व | नक्षत्रे | वनस्पती |
|---|---|---|
| **आकाश** | पोकळी म्हणजे काहीही जड स्थितीत नसणे . | म्हणून या तत्त्वाच्या वनस्पती नाहीत. |
| **वायु** | अश्विनी, मृग, पुर्नवसु, उत्तरा, हस्त, चित्रा, विशाखा. | सुगंधी वनस्पती लावणी-पेरणी साठी उचित. |
| **अग्नी** | भरणी, कृत्तिका, पुष्य, मघा, पूर्वा, स्वाती, पूर्वाभाद्रपदा. | बीजयुक्त फळे, धान्य लावणी-पेरणी साठी उचित. |
| **जल** | आर्द्रा, आश्लेषा, मूळ, पूर्वाषाढा, शततारका, रेवती, उत्तराभाद्रपदा. | पालेभाज्या व रसदार फळे लावणी-पेरणी साठी उचित. |
| **पृथ्वी** | रोहिणी, अनुराधा, ज्येष्ठा, उत्तराषाढा, श्रवण, धनिष्ठा, अभिजित. | कंदमूळ वर्गीय वनस्पती लागवडी साठी उचित. |

नक्षत्रे, सूर्य, पृथ्वी व चंद्र कसे स्थित आहेत हे लक्षात घेतल्यास वरील संदर्भ लगेच लक्षात येतील. त्या करीता भिंतीवरील घड्याळ नजरे समोर आणा. घड्याळ्यात १२ आकडे आहेत त्या ठिकाणी २८ नक्षत्रे आहेत व केंद्र स्थानी स्थित आहे. फिरणारे काटे म्हणजे ग्रह आहेत. या ग्रहामधेच एक पृथ्वी ही आहे. या पृथ्वी भोवती फिरणारा चंद्र आहे हेही आपण जाणतोच. सूर्याभोवती फिरणारी पृथ्वी घड्याळाच्या चालीच्या विरुद्ध दिशेने सूर्याभोवती वर्तुळाकार नाही तर लंब वर्तुळाकार कक्षेत फिरते. पृथ्वी वरून सूर्याच्या दिशेने पाहिले असता समोर दिसणारे नक्षत्र हे सूर्य नक्षत्र म्हणून संबोधिले जाते. तर पृथ्वी वरून चंद्राच्या दिशेने पाहिले असता समोर दिसणारे नक्षत्र हे चंद्र नक्षत्र म्हणून संबोधिले जाते. नक्षत्रे तीच आहेत. फक्त संदर्भानुसार सूर्य नक्षत्र किंवा चंद्र नक्षत्र म्हटले जाते. नक्षत्रे २८ आहेत व त्यांचा विस्तार कमी अधिक आहे, समान नाही,हे येथे लक्षात घ्यावे. त्यामुळे सूर्य नक्षत्राचा कालावधी हा ही कमी अधिक दिवसांचा असतो. तर चंद्राच्या गती मुळे चंद्र नक्षत्र रोज बदलत असते.

**शुक्लपक्ष** : जमिनीतील ओलावा वाढतो. झाडातील अन्नरस वरचे बाजुस गतिमान होतो.

**कृष्णपक्ष** : जमीन कोरडी होते. झाडांचे जमिनी खालील कार्य गतिशील होते

**तिथी -** चांद्र मासाची गणना तिथीने केली जाते. चंद्राचे पृथ्वीवरील बलाचा अंदाज तिथीने बांधता येतो. चंद्राचा प्रभाव पाण्यावर व कॅल्शीयम वर होतो. शुक्ल सप्तमी पासून पृथ्वीवरील पाण्यावर चंद्रा चा प्रभाव वाढू लागतो त्या पौर्णिमेला सर्वात जास्त असतो. पाणी, द्रव यांची तरलता वाढून त्याचे अभिसरण वाढते. तर कृष्ण प्रतिपदे पासून चंद्र प्रभाव कमी होण्यास सुरुवात होऊन कृष्ण सप्तमी ला तो सर्वात कमी प्रभावी असते. **यामुळे अमावास्या या तिथीला लागवड केली जात नाही.**

या उलट **चंद्र शनी प्रतियुती**च्या ( चंद्र व शनी पृथ्वीच्या दोन बाजूला एकमेकासमोर असतात त्या ) दिवशी **लागवडीचा उत्तम काळ समजला जातो**. दर महिन्याला साधारणतः असे एक / दोन दिवस असतात. याच प्रमाणे स्थानिक पारंपारीक ज्ञानानुसार वारां बद्दल ही ज्या चालीरीती आहेत त्याही वैज्ञानिक आहेत. त्यांचेही पालन अवश्य करावे.

**मुखपृष्ठावरील ऋतु - नक्षत्र - ग्रहचित्र श्री. विनायक श्रीकृष्ण महाजन, कुडावळे ४१५७१२**

**भारतातील एकमेव वैदिक पंचांग : "श्री मोहन कृति आर्ष पत्रकम्"** (वैदिक सिद्धान्त व वैदिक निर्देशानुसार सम्पात व अयनांवर आधारित) darshaney.smkatp@gmail.com

# ऋतुचर्या

ऋतु आणि आहार या दोन्हींचा मेळ घालून आपण जीवनशैलीचा अवलंब केला तर ते आरोग्यासाठी नक्कीच लाभदाई ठरते. आयुर्वेदात नमूद केलेल्या ऋतुचर्येमुळे ऋतु नुसार बदल होताना ( Seasonal Change ) होणाऱ्या विकारांचा प्रतिबंध सुध्दा केला जातो.

"यत्र पिंडे तत्र ब्रह्मांडे"शरिरात होणारे बदल व निसर्गात होणारे बदल एकमेकास पूरक असतात, म्हणूनच नित्यनेमाने ऋतुचर्येचे पालन करणे महत्वाचे आहे.

ऋतुचर्या आहार, आरोग्य हे एक नैसर्गिक चक्र आहे. अचूक काल चक्रात पाळलेली ऋतुचर्या लाभदाई ठरते. काळा प्रमाणे बदलणे हा त्यातील महत्वाचा नियम. त्याकरता प्रथमतः शास्त्रीय कालचक्र समजणे गरजेचे आहे. त्यासाठी ही दिनदर्शिका मार्गदर्शक ठरेल.

ऋतुचर्या पाळताना चालू ऋतुचे शेवटचे १५ दिवस व पुढील ऋतुचे पहिले १५ दिवस हा ऋतु संधि काळ म्हणून ओळखला जातो. या काळात चालू ऋतुची ऋतुचर्या कमी करून हळूहळू पुढील ऋतु चर्येचा अवलंब करावा.

दोन दोन महिन्यांचे सहा ऋतु आहेत. वसंत, ग्रीष्म , वर्षा, शरद, हेमंत, शिशिर. वर्षादी तीन ऋतुंनी दक्षिणायन होते . या काळात चंद्राची शक्ती बलवान असते. त्या मुळे वर्षा /शरद / हेमंत या ऋतुंमधे मनुष्य अनुक्रमे अल्प / मध्यम / उत्तम बलाकडे जातो. त्याच बरोबर शिशिरादी ऋतुंनी उत्तरायण होते. या काळात सूर्य शक्ती म्हणजेच अग्नितत्व प्रवळ असते. म्हणूनच मनुष्याचे बल हळूहळू कमी होते. मनुष्य अनुक्रमे शिशिर / वसंत / ग्रीष्म या ऋतु मधे उत्तम / मध्यम /हीन बलाकडे जातो. वरील तत्वे समजून घेऊन त्या प्रमाणे आहार, विहार यात बदल करणे गरजेचे आहे. असे केल्यास ऋतु बदलाचा त्रास होत नाही. वर उल्लेख केलेले मनुष्याचे बल म्हणजे नेमके काय ? तर मनुष्याचे बल म्हणजे,जाठराग्नी, शरीर बल, रोग प्रतिकारक शक्ती इत्यादी.

## वसंत ऋतु : महिने - चैत्र, वैशाख.

या ऋतु मधे शिशिर ऋतु मधील थंडपणा कमी होत जातो. सूर्याची किरणे हळूहळू ऊष्ण, तीक्ष्ण होण्यास सुरुवात होते, त्यामुळे शरीरात कफ दोषाचे विलयन होण्यास सुरुवात होते. सर्दी खोकला या सारखे विकार उद्भवू शकतात. त्यासाठी ' वमन ' हे पंचकर्म करून प्रकृति नुसार किंवा बाकी परिक्षा करून कफ प्रकोप आटोक्यात ठेवावा.

**आहार -** हलका आहार जो अतिस्निग्ध किंवा तेलकट नसेल असा घ्यावा.

**उपाय -** शुण्ठीचे ( सूंठ ) पाणी, मध + पाणी अशा पदार्थांचा अवलंब करावा. वसंत ऋतुत सुयोग्य शारिरीक व्यायाम सुद्धा करावा.

## ग्रीष्म ऋतु : महिने- ज्येष्ठ, आषाढ.

या ऋतु मध्ये सूर्य आपल्या अति तीव्र किरणांनी पृथ्वीवर उष्णता वाढवतो दिवसानु दिवस कफदोष कमी होऊन वात दोष वाढण्यास सुरुवात होते.

**आहार -** या ऋतु मधे मधुर रसाचे पदार्थ, हलका आहार, त्याच प्रमाणे द्रव पदार्थांचा आहारात समावेश करावा. भाजलेले सत्तुचे पीठ, नाचणीचे सत्व खावे . या ऋतु मधे पचनशक्ती पूर्णतः उत्तम नसल्यामुळे भुकेनुसार आहार घ्यावा. मांसाहार, मैदा, अतिसाखर / मिठाई इत्यादी पदार्थ टाळावेत. द्रव भाग असलेला आहार घ्यावा. दूध, गुलाब +कापूर, कोकम सरबत, करवंद सरबत इत्यादींचे सेवन करावे.

**उपाय -** या ऋतु मधे पचनशक्ती कमी होण्यास सुरुवात होते, व शरीरातील बल निसर्गतःच कमी होते. म्हणूनच सहा ऋतुंपैकी फक्त ग्रीष्म ऋतु मधे दिवास्वाप म्हणजेच दुपारी झोपणे / सकाळी उशिरा उठणे याची परवानगी आहे. यामुळे शारिरीक बल राखण्यास मदत होते. इतर सर्व ऋतु मध्ये दिवसा झोपण्यास सक्त मनाई आहे. विहारा मधे व्यायामादी गोष्टींचा समावेश होतो. आयुर्वेदात अर्धशक्ती व्यायाम म्हणजेच आपल्या पूर्ण ताकदीच्या अर्धी ताकद राखून ग्रीष्म ऋतु मधे व्यायाम करावा असे सांगितले आहे. या ऋतु मधे वटपौर्णिमा साजरी होते, ज्या मधे शास्त्रीयदृष्ट्या वडाच्या झाडाचे पंचांग ग्रीष्म ऋतु मधील वाढलेली ऊष्णता व शरिरातील पित्त दोष या दोन्हीसाठी गुणकारी आहे.

## वर्षा ऋतु : महिने- श्रावण, भाद्रपद.

आकाश ढगांनी व्याप्त असल्यामुळे व एकदम आर्द्र वायू सुरू झाल्यामुळे पचनशक्ती ग्रीष्म ऋतु पेक्षा मंद होते. ग्रीष्म ऋतु मधे शरिरात साठलेल्या वात दोषाचा प्रकोप वर्षा ऋतु मधे होतो. त्याच प्रमाणे पाणी गढूळ असल्या कारणाने बऱ्याच व्याधींचे निमित्त कारण ठरते.

**आहार -** वात शामक, दीपन,पाचन करणारा आहार व औषधे घ्यावीत. जुन धान्य, मसाला, सैंधव + ताक, दह्याची निवळी, यथायोग्य आंबट, खारट, स्निग्ध हलके अन्न खावे. या काळात विषमज्वर (व्हायरल फिवर) याचे प्रमाण वाढते. त्यामुळे विशिष्ठ ऋतुचर्या पाळून स्वतःची रोग प्रतिकारक शक्ती वाचविणे महत्वाचे आहे. या ऋतु मधे विशेषतः नारळी पौर्णिमा सणाला नारळ व गुळ याचा आहारात समावेश होतो. नारळ हा शीत गुणात्मक, ऊत्सर्जन संस्थेला पूरक, ज्वरात पथ्यकर आहे. तसेच गणेश चतूर्थी साठी उकडीचे मोदक केले जातात. सर्व प्रकरच्या मिठाई किंवा पक्वान्न या वर्गा मधे उकडीचे मोदक हा पथ्यकर पदार्थ आहे.

**उपाय -** वर्षा ऋतु मधे वाताचा प्रकोप व पित्ताचा संचय शरिरात होतो. ज्या मुळे शरद ऋतु मधे पित्तप्रधान लक्षणे दिसतात. वर्षा ऋतुत वातदोषाची प्रधान चिकीत्सा बस्ती पंचकर्म करावे.

## शरद ऋतु : महिने - आश्विन, कार्तिक.

या ऋतु मधे वर्षा ऋतुत साठलेल्या पित्ताचा प्रकोप होणारी लक्षणे दिसतात. प्रकोप म्हणजे नियमीत पातळी पेक्षा वाढलेली पातळी.

**आहार -** या ऋतु मधे कडू, मधुर, कषाय या चवी प्रधान असणारा आहार घ्यावा. या ऋतु मधे विरेचन , रक्त मोक्षण करणे गरजेचे आहे. तांदुळ, मूग, आवळा, पडवळ, मध इत्यादि चा आहारात समावेश करावा.

**उपाय -** या काळात शीतपित्त, त्वचा विकार, जळजळ इत्यादि रोग उद्भवण्याची शक्यता असते. धने + जीरे भिजवून असे पाणी पिणे फायद्याचे ठरते. दिवसा सूर्याची किरणे प्रखर असल्याने रात्री चंद्रशक्ती सिध्द दूध घ्यावे.

## हेमंत ऋतु : महिने - मार्गशीर्ष, पौष.

या ऋतु मधे निसर्ग मनुष्यास बल प्रदान करत असतो. म्हणून भरपूर व्यायाम करावा. त्या मुळे जठराग्नि प्रदिप्त असतो, भूक वाढते परिणामी हवा थंड असताना शरिरातील उष्मा राखला जातो. हा काळ बल प्राप्तीसाठी उत्तम आहे.

**आहार -** मधूर, आंबट, खारट आहार घ्यावा. पचनशक्ती चांगली असल्या कारणाने आयुर्वेदातील रसायन चिकित्सा ज्या मधे च्यवनप्राश, अश्वगंधा इत्यादी औषधांचे सेवन करावे.

## शिशिर ऋतु : महिने - माघ, फाल्गून.

या ऋतु मधे हेमंत ऋतु सारखीच ऋतुचर्या पाळता येते. परंतु हवे मधे रुक्षता जास्ती असते म्हणूनच मकर संक्रांतीला तीळ, गूळ असे पदार्थ खाऊन निसर्गातील शीत तत्व व रुक्षता या पासून शरिराचे रक्षण होते. शिशिर ऋतु मधे शरिराचे बल उत्तम झाल्यामुळे कफ संचय होतो म्हणून वसंत ऋतु मधे निरोगी रहाण्याची तयारी शिशिर ऋतु मधे करावयाची असते.

वैद्य गौतमी महेश फडके, मुंबई / भ्र. ८३२९९८६१९२ / drgautamip@gmail.com

# वैदिक दिनदर्शिका

सनातन आधारित, शास्त्रीय (Scientific), सहजोपयोगी, सांप्रत दृक्प्रत्ययी


## सुलभ जन पंचांग

जन पंचांगाची अंगे : १) ऋतु २) चांद्रमास ३) चंद्र नक्षत्र - सूर्य नक्षत्र ४) वार ५) तिथी


पंचांग आधार : श्री मोहन कृति आर्ष पत्रकम् (संपादक : आचार्य दार्शनेय लोकेश)
(वैदिक सिध्दांत व वैदिक निर्देशानुसार सम्पात व अयनांवर आधारित)

आर्षायण सी-२७६, गामा-१ ग्रेटर नोएडा उ. प्र., २०१३०८ फोन: ०१२०-४२७१४१०

खगोलीय कालचक्र



चांद्र गतिचक्र



ऋतु : वसंत

## चैत्र १९४७

### फेब्रुवारी–मार्च २०२५

शुक्लपक्ष — कृष्णपक्ष

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २ तृतीया पूर्वा भाद्रपदा ☀ शततारका | ९ दशमी आर्द्रा | रवि | | १६ द्वितीया हस्त | २३ नवमी पूर्वाषाढा |
| | ३ चतुर्थी रेवती | १० एकादशी पुनर्वसु | सोम | | १७ तृतीया स्वाती | २४ दशमी अभिजित |
| | ४ पंचमी अश्विनी | ११ द्वादशी पुष्य | मंगळ | चतुर्थी चंद्रोदय (मुंबई) | १८ चतुर्थी स्वाती चंद्रोदय : १०:१२ | २५ एकादशी श्रवण |
| | ५ षष्ठी भरणी | १२ त्रयोदशी आश्लेषा | बुध | | १९ पंचमी विशाखा | २६ द्वादशी धनिष्ठा |
| | ६ सप्तमी कृत्तिका | १३ चतुर्दशी मघा | गुरु | | २० षष्ठी विशाखा | २७ त्रयोदशी धनिष्ठा |
| २८ प्रतिपदा धनिष्ठा गुढीपाडवा | ७ अष्टमी रोहिणी | १४ पौर्णिमा पूर्वा फाल्गुनी ☀ पूर्वा भाद्रपदा ○ | शुक्र | | २१ सप्तमी ज्येष्ठा | २८ चतुर्दशी शततारका |
| १ द्वितीया शततारका | ८ नवमी आर्द्रा | | शनि | १५ प्रतिपदा उत्तरा फाल्गुनी | २२ अष्टमी मूल | २९ अमावास्या पूर्वा भाद्रपदा ● |

लव्ह कोकण
चविष्ट मेवा उत्कृष्ट सेवा
कोकणचे पहिले व्हॉट्सप शॉप
823 7699 423

# वैदिक दिनदर्शिका

सनातन आधारित, शास्त्रीय (Scientific), सहजोपयोगी, सांप्रत दृक्प्रत्ययी


## सुलभ जन पंचांग

जन पंचांगाची अंगे : १) ऋतु २) चांद्रमास ३) चंद्र नक्षत्र - सूर्य नक्षत्र ४) वार ५) तिथी


पंचांग आधार : श्री मोहन कृति आर्ष पत्रकम् (संपादक : आचार्य दार्शनेय लोकेश)
(वैदिक सिध्दांत व वैदिक निर्देशानुसार सम्पात व अयनांवर आधारित)

आर्षायण सी-२७६, गामा-१ ग्रेटर नोएडा उ. प्र., २०१३०८ फोन: ०१२०-४२७१४१०

खगोलीय कालचक्र



चांद्र गतिचक्र



ऋतु : वसंत-ग्रीष्म

## वैशाख १९४७

मार्च-एप्रिल २०२५

| शुक्लपक्ष | | | | कृष्णपक्ष | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ३० प्रतिपदा<br>उत्तरा भाद्रप्रदा<br>उत्तरा भाद्रप्रदा | ६ नवमी<br>पुनर्वसु | | रवि | १३ प्रतिपदा<br>हस्त | २० सप्तमी<br>अभिजित | २७ अमावास्या<br>रेवती |
| ३१ द्वितीया<br>रेवती<br>अक्षय्य तृतीया | ७ दशमी<br>पुष्य | | सोम | १४ प्रतिपदा<br>स्वाती | २१ अष्टमी<br>अभिजित<br>ग्रीष्म ऋतु आरंभ | |
| १ चतुर्थी<br>अश्विनी<br>अंगारक | ८ एकादशी<br>आश्लेषा | | मंगळ | १५ द्वितीया<br>विशाखा | २२ नवमी<br>श्रवण | |
| २ पंचमी<br>कृत्तिका | ९ द्वादशी<br>मघा<br>रेवती | | बुध | १६ तृतीया<br>अनुराधा | २३ दशमी<br>धनिष्ठा | |
| ३ षष्ठी<br>रोहिणी | १० त्रयोदशी<br>पूर्वा फाल्गुनी | | गुरु | १७ चतुर्थी<br>ज्येष्ठा<br>चंद्रोदय :१०:४१ | २४ एकादशी<br>धनिष्ठा<br>अश्विनी | चतुर्थी<br>चंद्रोदय (मुंबई) |
| ४ सप्तमी<br>मृग | ११ चतुर्दशी<br>उत्तरा फाल्गुनी | | शुक्र | १८ पंचमी<br>ज्येष्ठा | २५ द्वादशी<br>पूर्वा भाद्रपदा | |
| ५ अष्टमी<br>आर्द्रा | १२ पौर्णिमा<br>उत्तरा फाल्गुनी | | शनि | १९ षष्ठी<br>पूर्वाषाढा | २६ त्रयोदशी<br>उत्तरा भाद्रपदा | |

लव्ह कोकण
चविष्ट मेवा उत्कृष्ट सेवा
कोकणचे पहिले व्हॉट्सप शॉप
823 7699 423

# वैदिक दिनदर्शिका


सनातन आधारित, शास्त्रीय (Scientific), सहजोपयोगी, सांप्रत दृक्प्रत्ययी

## सुलभ जन पंचांग


जन पंचांगाची अंगे : १) ऋतु २) चांद्रमास ३) चंद्र नक्षत्र - सूर्य नक्षत्र ४) वार ५) तिथी

पंचांग आधार : श्री मोहन कृति आर्ष पत्रकम् (संपादक : आचार्य दार्शनेय लोकेश)
(वैदिक सिध्दांत व वैदिक निर्देशानुसार सम्पात व अयनांवर आधारित)
आर्षायण सी-२७६, गामा-१ ग्रेटर नोएडा उ. प्र., २०१३०८ फोन: ०१२०-४२७१४१०

खगोलीय कालचक्र



चांद्र गतिचक्र



ऋतु : ग्रीष्म


## जेष्ठ १९४७

एप्रिल–मे २०२५

शुक्लपक्ष | कृष्णपक्ष

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ४ सप्तमी पुष्य | ११ चतुर्दशी स्वाती | रवि | | १८ पंचमी अभिजित | २५ त्रयोदशी रेवती |
| २८ प्रतिपदा अश्विनी | ५ अष्टमी आश्लेषा | १२ पौर्णिमा स्वाती ○ वटपौर्णिमा | सोम | | १९ षष्ठी श्रवण | २६ चतुर्दशी भरणी |
| २९ द्वितीया भरणी | ६ नवमी मघा | | मंगळ | १३ प्रतिपदा विशाखा | २० सप्तमी धनिष्ठा | २७ अमावास्या कृत्तिका ● |
| ३० तृतीया रोहिणी संत तुकडोजी महाराज जयंती (ग्रामगीता) | ७ दशमी पूर्वा फाल्गुनी | | बुध | १४ द्वितीया अनुराधा | २१ नवमी धनिष्ठा ☀ कृत्तिका | |
| १ चतुर्थी मृग | ८ एकादशी उत्तरा फाल्गुनी ☀ भरणी | | गुरु | १५ तृतीया ज्येष्ठा | २२ दशमी शततारका | |
| २ पंचमी आर्द्रा | ९ द्वादशी उत्तरा फाल्गुनी | | शुक्र | १६ चतुर्थी मूळ चंद्रोदय : १०:४१ | २३ एकादशी पूर्वा भाद्रपदा | चतुर्थी चंद्रोदय (मुंबई) |
| ३ षष्ठी पुनर्वसु | १० त्रयोदशी हस्त | | शनि | १७ पंचमी उत्तराषाढा | २४ द्वादशी उत्तरा भाद्रप्रदा | |

KOP'S NURSERY
Large Range of Fruit Plants
Ornamental Plants
Medicinal Plants
Spices
Forest Plants



Dr. S. M. Koparkar M.B.B.S.
(Dr.) 9422431258 (Mrs.) 9422431265 / 8390020880
kopsnursery@yahoo.com
www.kopsnursery.com
At Gavhe, Tal. Dapoli, Dist. Ratnagiri, Pin 415712.

# वैदिक दिनदर्शिका

सनातन आधारित, शास्त्रीय (Scientific), सहजोपयोगी, सांप्रत दृक्प्रत्ययी


## सुलभ जन पंचांग

जन पंचांगाची अंगे : १) ऋतु २) चांद्रमास ३) चंद्र नक्षत्र - सूर्य नक्षत्र ४) वार ५) तिथी


पंचांग आधार : श्री मोहन कृति आर्ष पत्रकम् (संपादक : आचार्य दार्शनेय लोकेश)
(वैदिक सिध्दांत व वैदिक निर्देशानुसार सम्पात व अयनांवर आधारित)

आर्षायण सी-२७६, गामा-१ ग्रेटर नोएडा उ. प्र., २०१३०८ फोन: ०१२०-४२७१४१०

खगोलीय कालचक्र



चांद्र गतिचक्र



ऋतु : ग्रीष्म-वर्षा

## आषाढ १९४७

### मे-जून २०२५

शुक्लपक्ष — कृष्णपक्ष

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | १ षष्ठी आश्लेषा | ८ द्वादशी स्वाती | **रवि** | चतुर्थी चंद्रोदय (मुंबई) | १५ चतुर्थी श्रवण चंद्रोदय :१०:३९ | २२ द्वादशी अश्विनी वर्षाऋतु आरंभ |
| | २ सप्तमी आश्लेषा | ९ त्रयोदशी विशाखा | **सोम** | | १६ पंचमी धनिष्ठा | २३ त्रयोदशी भरणी |
| | ३ अष्टमी मघा | १० चतुर्दशी अनुराधा | **मंगळ** | | १७ षष्ठी धनिष्ठा | २४ चतुर्दशी रोहिणी |
| २८ द्वितीया रोहिणी स्वा. वीर सावरकर जयंती | ४ नवमी उत्तरा फाल्गुनी | ११ पौर्णिमा ज्येष्ठा गुरुपौर्णिमा | **बुध** | | १८ सप्तमी शततारका | २५ अमावास्या मृग दीपपूजा |
| २९ तृतीया आर्द्रा | ५ दशमी उत्तरा फाल्गुनी | | **गुरु** | १२ प्रतिपदा मूळ | १९ अष्टमी पूर्वा भाद्रपदा | |
| ३० चतुर्थी आर्द्रा | ६ एकादशी हस्त | | **शुक्र** | १३ द्वितीया पूर्वाषाढा | २० नवमी उत्तरा भाद्रपदा आर्द्रा | |
| ३१ पंचमी पुनर्वसु रोहिणी | ७ द्वादशी स्वाती | | **शनि** | १४ तृतीया अभिजित मृग | २१ दशमी रेवती | |


**फ्लायिंग बर्डस् एज्युकेशनल फाउंडेशन संचालित शाळा**

आंबेगाव, पुणे • देवराष्ट्रे, सांगली • पिंपोडे, सातारा • वाठार, सातारा

अधिक माहितीसाठी: https://flyingbirdschool.in

जाहिरात प्रायोजक : श्री. प्रवीण अनंत खाडिलकर, दादर, मुंबई

# वैदिक दिनदर्शिका


सनातन आधारित, शास्त्रीय (Scientific), सहजोपयोगी, सांप्रत दृक्प्रत्ययी

## सुलभ जन पंचांग


जन पंचांगाची अंगे : १) ऋतु २) चांद्रमास ३) चंद्र नक्षत्र - सूर्य नक्षत्र ४) वार ५) तिथी

पंचांग आधार : श्री मोहन कृति आर्ष पत्रकम् (संपादक : आचार्य दार्शनेय लोकेश)
(वैदिक सिध्दांत व वैदिक निर्देशानुसार सम्पात व अयनांवर आधारित)
आर्षायण सी-२७६, गामा-१ ग्रेटर नोएडा उ. प्र., २०१३०८ फोन: ०१२०-४२७१४१०

खगोलीय कालचक्र



चांद्र गतिचक्र



ऋतु : वर्षा

## श्रावण १९४७

### जून–जुलै २०२५

शुक्लपक्ष | कृष्णपक्ष

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २९ चतुर्थी आश्लेषा | ६ एकादशी विशाखा | **रवि** | | १३ तृतीया धनिष्ठा | २० दशमी भरणी |
| | ३० पंचमी मघा नागपंचमी | ७ द्वादशी विशाखा | **सोम** | चतुर्थी चंद्रोदय (मुंबई) | १४ चतुर्थी धनिष्ठा चंद्रोदय :१०:०३ | २१ एकादशी कृत्तिका |
| | १ षष्ठी पूर्वा फाल्गुनी | ८ त्रयोदशी ज्येष्ठा | **मंगळ** | | १५ पंचमी शततारका पुनर्वसु | २२ द्वादशी रोहिणी |
| | २ सप्तमी उत्तरा फाल्गुनी | ९ चतुर्दशी मूळ | **बुध** | | १६ षष्ठी पूर्वा भाद्रपदा | २३ चतुर्दशी आर्द्रा लोकमान्य टिळक जयंती |
| २६ प्रतिपदा आर्द्रा | ३ अष्टमी उत्तरा फाल्गुनी | १० पौर्णिमा पूर्वाषाढा नारळी पौर्णिमा | **गुरु** | | १७ सप्तमी उत्तरा भाद्रपदा | २४ अमावास्या आर्द्रा पिठोरी अमावास्या बैलपोळा |
| २७ द्वितीया पुनर्वसु | ४ नवमी स्वाती | | **शुक्र** | ११ प्रतिपदा अभिजित | १८ अष्टमी रेवती | |
| २८ तृतीया पुष्य | ५ दशमी स्वाती आझाद हिंद सेना स्थापना दिन | | **शनि** | १२ द्वितीया श्रवण | १९ नवमी अश्विनी | |

गिरिजा इलेक्ट्रिकल सर्व्हिसेस
पार्टनर परेश चं. वैशंपायन
सौ. मीरा प. वैशंपायन
मो.: ९६३७२५४१८२
सर्व प्रकारचे इलेक्ट्रीकल साहित्य मिळेल तसेच दुरुस्ती व इलेक्ट्रीकल वायरिंगची कामे करुन मिळतील.
अंकुर प्राईम, गाळा नं. १३०, दापोली–दाभोळ रोड, ए.जी. हायस्कूल जवळ, दापोली, जि. रत्नागिरी.
ऑफिस मोबा.: ८६९८२२१३३८ ✦ Email : girijaelectrical@gmail.com ✦ GSTIN : 27AAZFG2169B1Z5
LUMINOUS Crompton Hi-Fi electric MICROTEK POLYCAB legrand Jaquar

# वैदिक दिनदर्शिका


सनातन आधारित, शास्त्रीय (Scientific), सहजोपयोगी, सांप्रत दृक्प्रत्ययी

## सुलभ जन पंचांग


जन पंचांगाची अंगे : १) ऋतु २) चांद्रमास ३) चंद्र नक्षत्र - सूर्य नक्षत्र ४) वार ५) तिथी

पंचांग आधार : श्री मोहन कृति आर्ष पत्रकम् (संपादक : आचार्य दार्शनेय लोकेश)
(वैदिक सिध्दांत व वैदिक निर्देशानुसार सम्पात व अयनांवर आधारित)
आर्षायण सी-२७६, गामा-१ ग्रेटर नोएडा उ. प्र., २०१३०८ फोन: ०१२०-४२७१४१०

खगोलीय कालचक्र



चांद्र गतिचक्र



ऋतु : वर्षा–शरद

# भाद्रपद १९४७

## जुलै–ऑगस्ट २०२५

शुक्लपक्ष | कृष्णपक्ष

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २७ तृतीया<br>मघा | ३ नवमी<br>विशाखा | रवि | १० प्रतिपदा<br>धनिष्ठा | १७ नवमी<br>कृत्तिका | |
| चंद्रास्त (मुंबई) | २८ चतुर्थी<br>पूर्वा फाल्गुनी<br>चंद्रास्त :९:५१<br>श्री गणेश चतुर्थी | ४ दशमी<br>अनुराधा | सोम | ११ द्वितीया<br>धनिष्ठा | १८ दशमी<br>रोहिणी | |
| | २९ पंचमी<br>उत्तरा फाल्गुनी | ५ एकादशी<br>ज्येष्ठा | मंगळ | १२ तृतीया<br>पूर्वा भाद्रपदा | १९ एकादशी<br>आर्द्रा | |
| | ३० षष्ठी<br>उत्तरा फाल्गुनी | ६ द्वादशी<br>मूळ<br>☀ आश्लेषा | बुध | १३ चतुर्थी<br>पूर्वा भाद्रपदा<br>चंद्रोदय :१०:०५ | २० द्वादशी<br>आर्द्रा | चतुर्थी<br>चंद्रोदय (मुंबई) |
| | ३१ सप्तमी<br>हस्त | ७ त्रयोदशी<br>अभिजित | गुरु | १४ षष्ठी<br>रेवती | २१ त्रयोदशी<br>पुनर्वसु | |
| २५ प्रतिपदा<br>पुनर्वसु | १ अष्टमी<br>स्वाती<br>लो. टिळक पुण्यतिथी<br>☀ पुष्य | ८ चतुर्दशी<br>अभिजित<br>अनंत चतुर्दशी | शुक्र | १५ सप्तमी<br>अश्विनी<br>स्वातंत्र्य दिन | २२ चतुर्दशी<br>आश्लेषा | |
| २६ द्वितीया<br>आश्लेषा | २ अष्टमी<br>स्वाती | ९ पौर्णिमा<br>श्रवण<br>○ | शनि | १६ अष्टमी<br>भरणी | २३ अमावास्या<br>आश्लेषा<br>महालय<br>शरद ऋतु आरंभ<br>● ☀ मघा | |


# अनुमा निर्मिती उद्योग

दर्जेदार हापूस आमरस, करवंद सरबत, चलाख झेल्याचे निर्माते

1153, खरकंद, चिखलगाव, ता. दापोली, जि. रत्नागिरी 415712, महाराष्ट्र - भारत • संपर्क ओंकार माधव महाजन 7588005959

# वैदिक दिनदर्शिका

सनातन आधारित, शास्त्रीय (Scientific), सहजोपयोगी, सांप्रत दृक्प्रत्ययी


## सुलभ जन पंचांग

जन पंचांगाची अंगे : १) ऋतु २) चांद्रमास ३) चंद्र नक्षत्र - सूर्य नक्षत्र ४) वार ५) तिथी


पंचांग आधार : श्री मोहन कृति आर्ष पत्रकम् (संपादक : आचार्य दार्शनेय लोकेश)
(वैदिक सिध्दांत व वैदिक निर्देशानुसार सम्पात व अयनांवर आधारित)

आर्षायण सी-२७६, गामा-१ ग्रेटर नोएडा उ. प्र., २०१३०८ फोन: ०१२०-४२७१४१०

खगोलीय कालचक्र



चांद्र गतिचक्र



ऋतु : शरद

# अधिक आश्विन १९४७

## ऑगस्ट–सप्टेंबर २०२५

शुक्लपक्ष | कृष्णपक्ष

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २४ प्रतिपदा मघा | ३१ अष्टमी अनुराधा | ७ पौर्णिमा धनिष्ठा | रवि | | १४ अष्टमी रोहिणी ☀ उत्तरा फाल्गुनी | २१ अमावास्या पूर्वा फाल्गुनी |
| २५ द्वितीया उत्तरा फाल्गुनी | १ नवमी ज्येष्ठा | | सोम | ८ प्रतिपदा शततारका | १५ नवमी आर्द्रा | |
| २६ तृतीया उत्तरा फाल्गुनी | २ दशमी मूळ | | मंगळ | ९ द्वितीया पूर्वा भाद्रप्रदा | १६ दशमी आर्द्रा | |
| २७ चतुर्थी हस्त | ३ एकादशी पूर्वाषाढा ☀ पूर्वा फाल्गुनी | | बुध | १० तृतीया उत्तरा भाद्रप्रदा | १७ एकादशी पुनर्वसु | |
| २८ पंचमी स्वाती | ४ द्वादशी अभिजित | | गुरु | ११ चतुर्थी रेवती चंद्रोदय :९:३२ | १८ द्वादशी पुष्य | चतुर्थी चंद्रोदय (मुंबई) |
| २९ षष्ठी स्वाती | ५ त्रयोदशी श्रवण | | शुक्र | १२ पंचमी अश्विनी | १९ त्रयोदशी आश्लेषा | |
| ३० सप्तमी विशाखा | ६ चतुर्दशी धनिष्ठा | | शनि | १३ षष्ठी कृत्तिका | २० चतुर्दशी मघा | |

DataPatrol
Technologies Pvt Ltd
www.datapatroltech.com

# वैदिक दिनदर्शिका


सनातन आधारित, शास्त्रीय (Scientific), सहजोपयोगी, सांप्रत दृक्प्रत्ययी

## सुलभ जन पंचांग


जन पंचांगाची अंगे : १) ऋतु २) चांद्रमास ३) चंद्र नक्षत्र - सूर्य नक्षत्र ४) वार ५) तिथी

पंचांग आधार : श्री मोहन कृति आर्ष पत्रकम् (संपादक : आचार्य दार्शनेय लोकेश)
(वैदिक सिध्दांत व वैदिक निर्देशानुसार सम्पात व अयनांवर आधारित)
आर्षायण सी-२७६, गामा-१ ग्रेटर नोएडा उ. प्र., २०१३०८ फोन: ०१२०-४२७१४१०

खगोलीय कालचक्र



चांद्र गतिचक्र



ऋतु : शरद

# निज आश्विन १९४७

## सप्टेंबर–ऑक्टोबर २०२५

शुक्लपक्ष | कृष्णपक्ष

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २८ षष्ठी<br>ज्येष्ठा | ५ त्रयोदशी<br>शततारका | रवि | | १२ षष्ठी<br>मृग | १९ त्रयोदशी<br>उत्तरा फाल्गुनी<br>धन्वतरी जयंती |
| २२ प्रतिपदा<br>उत्तरा फाल्गुनी<br>घटस्थापना | २९ सप्तमी<br>मूळ | ६ चतुर्दशी<br>पूर्वा भाद्रपदा<br>हस्त | सोम | | १३ सप्तमी<br>आर्द्रा | २० चतुर्दशी<br>उत्तरा फाल्गुनी<br>नरक चतुर्दशी |
| २३ द्वितीया<br>उत्तरा फाल्गुनी | ३० अष्टमी<br>पूर्वाषाढा | ७ पौर्णिमा<br>उत्तरा भाद्रपदा<br>कोजागिरी पौर्णिमा | मंगळ | | १४ अष्टमी<br>पुनर्वसु | २१ अमावास्या<br>हस्त<br>लक्ष्मीपूजन<br>अखंड भारताच्या सरकारची स्थापना |
| २४ तृतीया<br>स्वाती | १ नवमी<br>अभिजित | | बुध | ८ द्वितीया<br>रेवती | १५ नवमी<br>पुनर्वसु | |
| २५ तृतीया<br>स्वाती | २ दशमी<br>श्रवण<br>विजया दशमी | | गुरु | ९ तृतीया<br>अश्विनी | १६ दशमी<br>आश्लेषा | |
| २६ चतुर्थी<br>विशाखा | ३ एकादशी<br>श्रवण | | शुक्र | १० चतुर्थी<br>भरणी<br>चंद्रोदय :९:०८ | १७ एकादशी<br>मघा<br>वसुबारस<br>गोवत्स द्वादशी<br>चित्रा (१२५९)<br>स्वाती (२२३५) | चतुर्थी<br>चंद्रोदय (मुंबई) |
| २७ पंचमी<br>विशाखा | ४ द्वादशी<br>धनिष्ठा | | शनि | ११ पंचमी<br>कृत्तिका | १८ द्वादशी<br>पूर्वा फाल्गुनी<br>धन तेरस | |

Arrowhead®
GLOBAL LOGISTICS INDIA PRIVATE LIMITED
Logistical Perfection In Global Commerce Since 2012

- International Freight Forwarding
- Worldwide Custom Clearance
- Worldwide Shipping by Sea-Air-Road
- Worldwide Multimodal Transportation
- Worldwide Warehousing & Dock Stuffing
- Worldwide Project Imports - Exports
- Worldwide end to end Logistics & Supply Chain

Office : SB - 60, Highland Corporate Center, High Street Mall, 2nd Floor, Next to C. P. Goenka International School, Kapurbawdi Junction, Thane (West) - 400607
Tel. No. : (+91 - 022 ) 4976 9847
Email : inbound@arrowheadglobal.in
outbound@arrowheadglobal.in
Website : www.arrowheadglobal.in

# वैदिक दिनदर्शिका

सनातन आधारित, शास्त्रीय (Scientific), सहजोपयोगी, सांप्रत दृक्प्रत्ययी


## सुलभ जन पंचांग

जन पंचांगाची अंगे : १) ऋतु २) चांद्रमास ३) चंद्र नक्षत्र - सूर्य नक्षत्र ४) वार ५) तिथी


पंचांग आधार : श्री मोहन कृति आर्ष पत्रकम् (संपादक : आचार्य दार्शनेय लोकेश)
(वैदिक सिध्दांत व वैदिक निर्देशानुसार सम्पात व अयनांवर आधारित)

आर्षायण सी-२७६, गामा-१ ग्रेटर नोएडा उ. प्र., २०१३०८ फोन: ०१२०-४२७१४१०

खगोलीय कालचक्र



चांद्र गतिचक्र



ऋतु : शरद-हेमंत

# कार्तिक १९४७

## ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२५

शुक्लपक्ष | कृष्णपक्ष

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २६ पंचमी ज्येष्ठा | २ एकादशी शततारका | **रवि** | | ९ पंचमी आर्द्रा | १६ द्वादशी उत्तरा फाल्गुनी |
| | २७ पंचमी मूळ | ३ त्रयोदशी पूर्वा भाद्रपदा | **सोम** | | १० षष्ठी आर्द्रा | १७ त्रयोदशी हस्त |
| | २८ षष्ठी अभिजित | ४ चतुर्दशी रेवती | **मंगळ** | | ११ सप्तमी पुनर्वसु | १८ त्रयोदशी स्वाती |
| २२ प्रतिपदा स्वाती बलि प्रतिपदा | २९ सप्तमी अभिजित | ५ पौर्णिमा अश्विनी त्रिपुरी पौर्णिमा | **बुध** | | १२ अष्टमी आश्लेषा | १९ चतुर्दशी स्वाती |
| २३ द्वितीया विशाखा भाऊबीज हेमंत ऋतु आरंभ | ३० अष्टमी श्रवण | | **गुरु** | ६ प्रतिपदा भरणी | १३ नवमी मघा | २० अमावास्या विशाखा |
| २४ तृतीया विशाखा | १ नवमी धनिष्ठा | | **शुक्र** | ७ द्वितीया कृत्तिका विशाखा | १४ दशमी पूर्वा फाल्गुनी | |
| २५ चतुर्थी ज्येष्ठा | २ दशमी धनिष्ठा | | **शनि** | ८ तृतीया रोहिणी | १५ एकादशी उत्तरा फाल्गुनी | |


शेठ GOSHALA
शेठ गोशाळा नंदी युक्त घाणा तेल
(कोल्ड प्रेस्ड ऑईल)
१००% शुध्द व प्रामाणिकपणा यांचे मिलन
नंदी युक्त घाणा तेल
आपल्या आरोग्यासाठी अतिशय योग्य.
अनेक आजारांना दूर ठेवणारे.

शुद्ध, नैसर्गिक, आणि पावित्र्याची हमी म्हणजे
शेठ गोशाळा, मंडणगड यांची
पंचगव्य आणि हर्बल उत्पादने
www.shethgoshala.com
: 9356421537
SHETH GOSHALA : P. S. Sheth Nagar, Pat Road, AT-Surle, P.O. Mandangad, District Ratnagiri, M.S., Pin-415203. @shethgoshala

# वैदिक दिनदर्शिका

सनातन आधारित, शास्त्रीय (Scientific), सहजोपयोगी, सांप्रत दृक्प्रत्ययी


## सुलभ जन पंचांग

जन पंचांगाची अंगे : १) ऋतु २) चांद्रमास ३) चंद्र नक्षत्र - सूर्य नक्षत्र ४) वार ५) तिथी


पंचांग आधार : श्री मोहन कृति आर्ष पत्रकम् (संपादक : आचार्य दार्शनेय लोकेश)
(वैदिक सिध्दांत व वैदिक निर्देशानुसार सम्पात व अयनांवर आधारित)

आर्षायण सी-२७६, गामा-१ ग्रेटर नोएडा उ. प्र., २०१३०८ फोन: ०१२०-४२७१४१०

खगोलीय कालचक्र



चांद्र गतिचक्र



ऋतु : हेमंत

## मार्गशीर्ष १९४७

### नोव्हेंबर–डिसेंबर २०२५

शुक्लपक्ष | कृष्णपक्ष

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २३ तृतीया<br>मूळ | ३० दशमी<br>पूर्वा भाद्रपदा | रवि | | ७ तृतीया<br>आर्द्रा | १४ दशमी<br>हस्त |
| | २४ चतुर्थी<br>उत्तराषाढा<br>☀ अनुराधा | १ एकादशी<br>उत्तरा भाद्रपदा | सोम | चतुर्थी<br>चंद्रोदय (मुंबई) | ८ चतुर्थी<br>पुनर्वसु<br>चंद्रोदय :९:४३ | १५ एकादशी<br>स्वाती |
| | २५ पंचमी<br>अभिजित | २ द्वादशी<br>रेवती<br>☀ ज्येष्ठा | मंगळ | | ९ पंचमी<br>पुष्य | १६ द्वादशी<br>स्वाती<br>☀ मूळ |
| | २६ षष्ठी<br>श्रवण<br>चंपाषष्ठी | ३ त्रयोदशी<br>अश्विनी | बुध | | १० षष्ठी<br>आश्लेषा | १७ त्रयोदशी<br>विशाखा |
| | २७ सप्तमी<br>धनिष्ठा | ४ चतुर्दशी<br>भरणी<br>श्रीदत्त जन्मोत्सव | गुरु | | ११ सप्तमी<br>मघा | १८ चतुर्दशी<br>अनुराधा |
| २१ प्रतिपदा<br>अनुराधा<br>देवदीपावली | २८ अष्टमी<br>धनिष्ठा | | शुक्र | ५ प्रतिपदा<br>रोहिणी | १२ अष्टमी<br>उत्तरा फाल्गुनी | १९ अमावास्या<br>ज्येष्ठा<br>● |
| २२ द्वितीया<br>ज्येष्ठा | २९ नवमी<br>शततारका | | शनि | ६ द्वितीया<br>आर्द्रा<br>डॉ.भीमराव आंबेडकर महापरिनिर्वाण दिन | १३ नवमी<br>उत्तरा फाल्गुनी | २० अमावास्या<br>मूळ |

यात आहे सर्वकाही जे तुमच्या केसांना हवे!
नियमित वापरा...
केशरंजना® तेल आणि गोळ्या
जास्वंद, आवळा, वड, ब्राम्ही आणि म्हाका यांचे संतुलित मिश्रण!
आगोम औषधालय प्रा.लि.
कोळथरे, ता.दापोली
जि.रत्नागिरी पिन 415712
दूरध्वनी :
9370848797, 9404865059


# वैदिक दिनदर्शिका

सनातन आधारित, शास्त्रीय (Scientific), सहजोपयोगी, सांप्रत दृक्प्रत्ययी


## सुलभ जन पंचांग

जन पंचांगाची अंगे : १) ऋतु २) चांद्रमास ३) चंद्र नक्षत्र - सूर्य नक्षत्र ४) वार ५) तिथी


पंचांग आधार : श्री मोहन कृति आर्ष पत्रकम् (संपादक : आचार्य दार्शनेय लोकेश)
(वैदिक सिध्दांत व वैदिक निर्देशानुसार सम्पात व अयनांवर आधारित)

आर्षायण सी-२७६, गामा-१ ग्रेटर नोएडा उ. प्र., २०१३०८ फोन: ०१२०-४२७१४१०

खगोलीय कालचक्र



चांद्र गतिचक्र



ऋतु : हेमंत-शिशिर

## पौष १९४७

### डिसेंबर २०२५—जानेवारी २०२६

शुक्लपक्ष | कृष्णपक्ष

| शुक्लपक्ष | | | | कृष्णपक्ष | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २१ प्रतिपदा पूर्वाषाढा भोगी | २८ अष्टमी उत्तरा भाद्रपदा | | रवि | ४ प्रतिपदा आर्द्रा | ११ अष्टमी स्वाती | १८ अमावास्या अभिजित |
| २२ द्वितीया अभिजित मकरसंक्रांत शिशिर ऋतु आरंभ | २९ नवमी रेवती | | सोम | ५ द्वितीया पुनर्वसु अभिजित | १२ नवमी स्वाती स्वामी विवेकानंद जयंती | |
| २३ तृतीया श्रवण राष्ट्रीय कृषि दिन | ३० दशमी अश्विनी | | मंगळ | ६ तृतीया आश्लेषा | १३ दशमी विशाखा | |
| २४ चतुर्थी धनिष्ठा | ३१ द्वादशी भरणी | | बुध | ७ चतुर्थी मघा चंद्रोदय :१०:१९ | १४ एकादशी विशाखा | चतुर्थी चंद्रोदय (मुंबई) |
| २५ पंचमी धनिष्ठा | १ त्रयोदशी कृत्तिका | | गुरु | ८ पंचमी पूर्वा फाल्गुनी | १५ द्वादशी ज्येष्ठा | |
| २६ षष्ठी शततारका पूर्वाषाढा | २ चतुर्दशी रोहिणी | | शुक्र | ९ षष्ठी उत्तरा फाल्गुनी | १६ त्रयोदशी ज्येष्ठा | |
| २७ सप्तमी पूर्वा भाद्रपदा | ३ पौर्णिमा आर्द्रा उत्तराषाढा | | शनि | १० सप्तमी उत्तरा फाल्गुनी | १७ चतुर्दशी पूर्वाषाढा | |




कोकणी फुलांचे मोहक परफ्यूम
kostalvibes.com
Mob. 90679 63601 kostalvibes@gmail.com
KOSTAL ViBES
essence of konkan

# वैदिक दिनदर्शिका


सनातन आधारित, शास्त्रीय (Scientific), सहजोपयोगी, सांप्रत दृक्प्रत्ययी

## सुलभ जन पंचांग


जन पंचांगाची अंगे : १) ऋतु २) चांद्रमास ३) चंद्र नक्षत्र - सूर्य नक्षत्र ४) वार ५) तिथी

पंचांग आधार : श्री मोहन कृति आर्ष पत्रकम् (संपादक : आचार्य दार्शनेय लोकेश)
(वैदिक सिध्दांत व वैदिक निर्देशानुसार सम्पात व अयनांवर आधारित)
आर्षायण सी-२७६, गामा-१ ग्रेटर नोएडा उ. प्र., २०१३०८ फोन: ०१२०-४२७१४१०

खगोलीय कालचक्र



चांद्र गतिचक्र



ऋतु : शिशिर

# माघ १९४७

## जानेवारी–फेब्रुवारी २०२६

शुक्लपक्ष — कृष्णपक्ष

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २५ सप्तमी रेवती रथसप्तमी | १ पौर्णिमा पुनर्वसु ○ | **रवि** | | ८ सप्तमी स्वाती | १५ त्रयोदशी अभिजित |
| १९ प्रतिपदा अभिजित | २६ अष्टमी रेवती प्रजासत्ताक दिन | | **सोम** | २ प्रतिपदा आश्लेषा | ९ अष्टमी स्वाती | १६ चतुर्दशी श्रवण शिवरात्र |
| २० द्वितीया श्रवण | २७ नवमी अश्विनी | | **मंगळ** | ३ द्वितीया आश्लेषा | १० अष्टमी विशाखा | १७ अमावास्या धनिष्ठा ● |
| २१ तृतीया धनिष्ठा | २८ दशमी कृत्तिका | | **बुध** | ४ तृतीया पूर्वा फाल्गुनी | ११ नवमी अनुराधा | |
| २२ चतुर्थी धनिष्ठा ☀ श्रवण | २९ एकादशी रोहिणी | | **गुरु** | ५ चतुर्थी उत्तरा फाल्गुनी चंद्रोदय :९:५० ☀ धनिष्ठा | १२ दशमी ज्येष्ठा | चतुर्थी चंद्रोदय (मुंबई) |
| २३ पंचमी शततारका नेताजी सुभाषचंद्र बोस जयंती | ३० द्वादशी आर्द्रा | | **शुक्र** | ६ पंचमी उत्तरा फाल्गुनी | १३ एकादशी मूल | |
| २४ षष्ठी पूर्वा भाद्रपदा | ३१ त्रयोदशी आर्द्रा | | **शनि** | ७ षष्ठी हस्त | १४ द्वादशी उत्तराषाढा | |

लव्ह कोकण
चविष्ट मेवा उत्कृष्ट सेवा
कोकणचे पहिले व्हॉट्सप शॉप
823 7699 423

# वैदिक दिनदर्शिका

सनातन आधारित, शास्त्रीय (Scientific), सहजोपयोगी, सांप्रत दृक्प्रत्ययी

## सुलभ जन पंचांग

जन पंचांगाची अंगे : १) ऋतु २) चांद्रमास ३) चंद्र नक्षत्र - सूर्य नक्षत्र ४) वार ५) तिथी


पंचांग आधार : श्री मोहन कृति आर्ष पत्रकम् (संपादक : आचार्य दार्शनेय लोकेश)
(वैदिक सिध्दांत व वैदिक निर्देशानुसार सम्पात व अयनांवर आधारित)

आर्षायण सी-२७६, गामा-१ ग्रेटर नोएडा उ. प्र., २०१३०८ फोन: ०१२०-४२७१४१०

खगोलीय कालचक्र



चांद्र गतिचक्र



ऋतु : शिशिर - वसंत

## फाल्गुन १९४७

### फेब्रुवारी–मार्च २०२६

| शुक्लपक्ष | | | | कृष्णपक्ष | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | २२ पंचमी रेवती | १ त्रयोदशी पुष्य | रवि | | ८ पंचमी स्वाती | १५ एकादशी श्रवण |
| | २३ षष्ठी अश्विनी | २ चतुर्दशी आश्लेषा होलिकोत्सव ☀ शततारका | सोम | | ९ षष्ठी विशाखा | १६ द्वादशी धनिष्ठा |
| | २४ सप्तमी भरणी | ३ पौर्णिमा मघा ○ | मंगळ | | १० सप्तमी अनुराधा | १७ त्रयोदशी धनिष्ठा |
| १८ प्रतिपदा धनिष्ठा | २५ नवमी रोहिणी | | बुध | ४ प्रतिपदा पूर्वा फाल्गुनी | ११ अष्टमी ज्येष्ठा | १८ चतुर्दशी शततारका |
| १९ द्वितीया शततारका छत्रपती शिवाजी महाराज जयंती तारखेप्रमाणे | २६ दशमी मृग | | गुरु | ५ द्वितीया उत्तरा फाल्गुनी | १२ नवमी मूळ | १९ अमावास्या पूर्वा भाद्रपदा ● |
| २० तृतीया पूर्वा भाद्रपदा वसंत ऋतु आरंभ | २७ एकादशी आर्द्रा | | शुक्र | ६ तृतीया हस्त छत्रपती शिवाजी महाराज जयंती तिथीनुसार | १३ दशमी पूर्वाषाढा | |
| २१ चतुर्थी उत्तरा भाद्रपदा | २८ द्वादशी पुनर्वसु | | शनि | ७ चतुर्थी स्वाती चंद्रोदय १०:०६ | १४ दशमी अभिजित ☀ पूर्वा भाद्रपदा | चतुर्थी चंद्रोदय (मुंबई) |

लव्ह कोकण
चविष्ट मेवा उत्कृष्ट सेवा
कोकणचे पहिले व्हॉट्सप शॉप
823 7699 423